# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट २९८-२२ दिनांक ०४/१०/२२

## सेविंग स्किमव्द्वारे गुंतवणुकदारांची करोडो रुपयांची फसवणुक करणारा आरोपी गजाआड - आर्थिक गुन्हे शाखेची कामगिरी

एस. कुमार गोल्ड ॲण्ड डायमंड शाखा मिरारोड व वसई या दोन शाखेव्द्वारे मिरा-भाईंदर, वसई विरार परीसरातील गुंतवणुकदारांना गुंतवणुकीवर १५ टक्के पेक्षा जास्त व्याजाचे आमीष देवुन गुंतवणुकदारांकडुन करोडो रुपये स्विकारुन नमुद रक्कम विहीत मुदतीमध्ये गुंतवणुकदारांना परत न करता आपले ज्वेलर्स दुकान बंद करुन गुंतवणुकदारांची फसवणुक करुन आरोपी नामे श्रीकुमार शंकरा पिल्लई हा पळुन गेल्याने गुंतवणुकदारांच्या तक्रारीवरुन नयानगर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १५२/२०२२ भादंवि कलम ४२०,४०९,३४ सह कलम ३,४ एम.पी.आय.डी. ॲक्ट प्रमाणे दिनांक ०८/०३/२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे अनुषंगाने वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली आर्थिक गुन्हे शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी तपास करुन नमुद गुन्हयातील आरोपी नामे श्रीकुमार शंकरा पिल्लई वय ६४ वर्षे रा. मुंलुंड कॉलनी, मुंलुड यास दि. २९/०९/२२ रोजी अटक केली आहे.

तरी मिरा-भाईंदर, वसई विरार परीसरातील गुंतवणुकदारांना आवाहन करण्यात येते की, एस. कुमार गोल्ड ॲण्ड डायमंड शाखा मिरारोड व वसई या दोन शाखेमध्ये ज्यांनी कोणी गुंतवणुक केली परंतु त्यांना केलेली गुंतवणुक परत मिळाली नाही, अश्या गुंतवणुकदारांनी गुन्हा दाखल करण्यासाठी सहायक पोलीस निरिक्षक श्री. मनिष वानखडे, आर्थिक गुन्हे शाखा, मो.क्र. ९७३०९६५९९६ याचेशी संपर्क करावा किंवा ईमेल आयडी **acpeow.mb-vv@mahapolice.gov.in** यावर तक्रार करावी.

सदरची कामगिरी मा.श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), अति. कार्यभार पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्रीमती पद्मजा बढे, सहायक पोलीस आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली स.पो.नि. मनिष वानखडे, स.फौ.पांडुरंग घुले, पो.ह.रमन पुकळे , पो.शि. संतोष पुणेकर यांनी केली आहे.

**-----0000-----**